स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२४–२५/२३१ दि. १३/०९/२०२४

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित महाविद्यालये परिसंस्था,
पुणे महानगरपालिका हद्द,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : 'स्वच्छता ही सेवा २०२४' अभियान राबविणेबाबत

महोदय,

मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या पत्रानुसार महाराष्ट्र शासनाकडून 'स्वच्छता ही सेवा २०२४' हे अभियान राबविण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार दि. १४ सप्टेंबर ते दि. ०१ ऑक्टोबर २०२४ या पंधरवडयामध्ये स्वच्छता ही सेवा (SHS)२०२४ अभियानाची जागरूकता पसरविणे, सार्वजनिक स्वच्छतेबाबत जनजागृती करणे असे निर्देशित करण्यात आले आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त रासेयो स्वंयसेवकांना या उपक्रमात सहभागी होण्याकरिता प्रोत्साहीत करावे. या उपक्रमातंर्गत सार्वजनिक स्वच्छतेबाबत जनजागृती मोहिमांचे आयोजन करण्यात यावे. तसेच निंबध स्पर्धा, जिंगल स्पर्धा, चित्रकला, पोस्टर्स ड्रॉइंग स्पर्धा व स्ट्रीट प्ले स्पर्धा, प्रश्न मंजुषा, घोषवाक्य स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे आणि स्वच्छता प्रतिज्ञा व थ्री आर उपक्रम राबविण्याविषयी उचित कार्यवाही दि. २७ सप्टेंबर २०२४ पूर्वी करण्यात यावी. तसेच सदर उपक्रम संपन्न झाल्यानंतर उपक्रमांचे फोटो व अहवाल दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी swmadata@punecorporation.org व nss_student_list@pun.unipune.ac.in या मेलवर (विषय: स्वच्छता ही सेवा २०२४ अभियान) पाठवण्यात यावा. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे पत्र

उप आयुक्त कार्यालय
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- घ.क.व्य.का/३२८९
दिनांक :- ०९/०९/२०२४

प्रति
माप्रादेशिक संचालक.
राष्ट्रीय सेवा योजना
महाराष्ट्र व गोवा

विषय :- स्वच्छता ही सेवा २०२४ अभियान दि. १४ सप्टेंबर, २०२४ ते दि.०१ ऑक्टोबर, २०२४ या पंधरवड्यात राबविणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालयाकडील पत्र क्र. राअस/स्वच्छता-संस्कार स्वच्छता/८९७/२४-२५ दिनांक ०२/०९/२०२४.

मा. सर / मॅडम,

उपरोक्त विषयाबाबत वरील संदर्भांकित पत्रान्वये स्वच्छता ही सेवा २०२४ अंतर्गत दि.१४/०९/२०२४ ते ०१/१०/२०२४ या कालावधीमध्ये स्वच्छता पंधरवडा अभियान राबविणेबाबत महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालयामार्फत कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांतर्गत दिनांक १४/०९/२०२४ व ०१/१०/२०२४ या कालावधीमध्ये स्वच्छता ही सेवा (SHS) २०२४ अभियाना अंतर्गत स्वच्छता की भागिदारी, संपूर्ण स्वच्छता,सफाई मित्र सुरक्षा शिबिर व स्वच्छ भारत दिवस साजरा करणे इ.विविध उपक्रम राबविणे विषयी कळविणेत आले आहे. यामध्ये फ्लॅशमॉब, सार्वजनिक स्वच्छतेबाबत जनजागृती करणे, शाळा/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शैक्षणिक संस्था / शाळा / महाविद्यालयामध्ये स्वच्छ भारत अभियानाची जागरुकता पसरविण्यासाठी कविता, निबंध, जिंगल्स, चित्रकला, पोस्टर, घोषवाक्य लेखन आणि प्रश्न मंजुषा आयोजित करणे, परिसरातील स्वच्छता करणे, प्लास्टिक कचरा गोळा करणे, नागरिकांमध्ये जनजागृती करणे याचा समावेश आहे

संदर्भांकिंत पत्रान्वये कळविलेनुसार स्वच्छता की भागीदारी उपक्रमाअंतर्ग आपल्या अधिनस्त असणा-या शैक्षणिक सस्था/ शाळा / महाविद्यालयामध्ये स्वच्छ भारत अभियानाची जागरुकता पसरविण्यासाठी स्वच्छता मोहिमांचे आयोजन करण्यात यावे. त्याचप्रमाणे कविता, निबंध, जिंगल्स, चित्रकला, पोस्टर, घोषवाक्य लेखन आणि प्रश्न मंजुषा आयोजित करण्यात याव्यात व स्वच्छता प्रतिज्ञा घेणे व श्री आर उपक्रम राबविणे विषयी उचित कार्यवाही दि.२७/०९/२०२४ पर्यत करण्यात यावी. आपले विभागामार्फत केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण अहवाल दि.२७/०९/२०२४ रोजी पर्यत घनकचरा व्यवस्थापन विभागास swmadata@punecorporation.org या संकेतस्थळावर सादर करणेस विनंती आहे.

या समाजउपयोगी पर्यावरणपूर्वक कार्यक्रमात आपण सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करावा ही विनंती आहे.
कळावे.

KGhatge

उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका